International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 November – December 2022

# महिलांच्या सक्षमिकीकरणात शिक्षणाची भूमिका एक अभ्यास

**डॉ.बानाटे चंद्रमा सुधाकर**
श्री. सरस्वती भुवन प्रशाला, औरंगपुरा,छत्रपती संभाजीनगर
*Corresponding Author-* **डॉ.बानाटे चंद्रमा सुधाकर**
**Email:** chandramasawant@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.17667944**

**प्रस्तावना**

भारतामध्ये महिलांना अनादी काळापासून महिलांना परावलंबित्व घटक म्हणूनओळख निर्माण झालेली आहे. विशेषतः उत्तर वैदिक कालखंडानंतर महिलांवर धार्मिक बंधने सक्तीने लावली गेली. याचा परिणाम म्हणून महिला या विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेल्या. ब्रिटिश शासन काळात राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी महिलांच्या सक्षमीकरण प्रकियेला महत्त्वपूर्ण मानले. परंतु महिलांना सक्षम करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता सर्वप्रथम महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे एक महिला शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. या विचारानुसार नंतरच्या कालखंडात महिला सक्षमीकरण प्रक्रियेत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले होते. त्यानुसार विविध विकासवादी योजनांमध्ये शिक्षण हा घटक अग्रगण्य राहिलेला आहे. परंतु आज महिलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते त्यामागील महत्त्वाचे कारण महिलांना समाजात दिली जाणारे दुय्यम स्थान, परंपरागत विचारसरणी महत्वाची ठरली आहे.त्यामुळे महिला सक्षमीकरण प्रक्रियेत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणे महत्त्वाचे ठरते.

**उद्दिष्टे**

1)महिलांच्या सक्षमीकरणाच्या संकल्पना अभ्यासणे.
2)शिक्षणामुळे महिलांच्या सामाजिक व आर्थिक घटकावर होणारा परिणाम अभ्यासणे.
3)महिला सक्षमिकीकरणात शिक्षणाचा प्रभाव अभ्यासणे.

**गृहीतके**

1)शिक्षणामुळे महिलांच्या सक्षमीकरणावर सकारात्मक बदल झाला आहे.
3)महिलांच्या सक्षमिकीकरणात उच्च शिक्षण महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.
3)शिक्षणामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात वाढ झालेली आहे.

**शिक्षणाचा महिला सक्षमिकीकरणावर झालेला परिणाम**

शिक्षणाद्वारे महिलांचा सक्षमीकरणाचे पुढील प्रमाणे परिणाम झालेले दिसून येतात.

**1)आत्मविश्वास व आत्मनिर्भरता:**

महिला अनादी काळापासून समाजामध्ये दुय्यम घटक म्हणून जगत होत्या आत्मनिर्भरता निर्माण झालेली आहे घराच्या संधी उपलब्ध झालेल्या असल्यामुळे त्यांना आत्मनिर्भर होण्याचा मार्ग प्राप्त झालेला आहे

आर्थिक आत्मनिर्भरता:

शिक्षणामुळे महिला रोजगाराभिमुख वृत्तीकडे वळालेल्या आढळून येतात. महिला या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये दुय्यम जीवन जगत होत्या.परंतु शिक्षणाने त्यांच्यात एक आत्मनिर्भरता निर्माण झाली

**2)निर्णय क्षमतेत वाढ:**

शिक्षणामुळे महिलांमध्ये बौद्धिक विकास झालेला आहे. पूर्वी पुरुषप्रधान कुटुंबामध्ये घेतलेल्या निर्णयावर त्यांना जगावे लागत होते.परंतु शिक्षणामुळे त्या स्वतःबाबत आणि निर्णय क्षमतेत कुटुंबाच्या बाबत निर्णय घेण्यास सक्षम झालेले आहेत.

**3)सामाजिक आदर:**

एकेकाळी सामाजिक क्षेत्रात महिलांना दुय्यम स्थान दिले जायचे. उच्चशिक्षित महिलांना समाजात आदराचे स्थान आता मिळू लागली आहे.

**4)राजकीय सहभाग वाढला:**

शिक्षणामुळे महिलांमध्ये ज्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक जाणीव निर्माण झाल्या. त्याच प्रमाणात राजकीय जाणीव निर्माण झाल्याचे पहावयास मिळते.महिलांनी राजकीय क्षेत्रात देखील सहभाग नोंदवला आहे. ग्रामपंचायत पासून ते भारतीय संसदेमध्ये त्यांनी सहभाग नोंदवलेले दिसून येते.

**5)आरोग्य बाबत जागृती:**

शिक्षणाच्या अभावामुळे महिलांना स्वतःच्या आरोग्याबाबत कसली जाणीव नव्हती. आरोग्याच्या समस्या नेहमीच अग्रणी राहत होत्या. या परिस्थितीत बदलून त्यांना आरोग्याबाबत ज्ञान मिळत मिळत आहे. त्याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या आरोग्य विषयी जीवनावर झालेला दिसून येतो

**6) लिंग समानतेची जाणीव**

महिलांचा सामाजिक अभ्यास केला असता स्पष्ट होते की त्यांचे अस्तित्व पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये दुय्यम स्वरूपाचे राहिले होते. आधुनिक कालखंडामध्ये शिक्षणाच्या प्रभावामुळे महिला सुद्धा समाजामध्ये लिंगसमानतेची जाणीव निर्माण करून देत आहेत.

**7)सामाजिक रूढी परंपरा यांच्या बद्दल लढण्याची क्षमता:**

भारतामध्ये महिलांना धर्म - चालीरीती तसेच रुढी, परंपरामुळे महिलांना कायम गुलामगिरीत राहावे लागले होते. परावलंबीत्वाची भावना त्यांच्यामध्ये बिंबवण्यात आली होती. अशा परिस्थितीमध्ये शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण होऊन परंपरागत तसेच नकारात्मक प्रवृत्ती विरुद्ध लढण्याची क्षमता शिक्षणामुळे प्राप्त झालेली दिसून येते.

**8)बालविवाह कमी वयात लग्न करण्याची प्रवृत्ती कमी झाली:**

पूर्वी धर्म आणि चालीरीतीमुळे मुलींचे बालविवाह किंवा कमी वयात लग्न करून दिले जात होते. शिक्षणामुळे या परिस्थितीमध्ये बदल झालेला दिसून येतो. त्यानुसार शिक्षित मुली आर्थिक क्षमतेला महत्त्व देऊ लागल्यामुळे त्यांची कमी वयात लग्न करण्याची मानसिकता राहिली नाही.

**9)राष्ट्रीय विकासात योगदान:**

महिला या कुटुंबाचा समाजाचा आधारस्तंभ राहिलेले आहेत. परंतु पुरुषप्रधान मानसिकतेमुळे त्यांच्यावर धार्मिक व सामाजिक बंधने लादण्यात आली होती. आधुनिक कालखंडात शिक्षणाच्या प्रभावामुळे त्यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा होत असताना दिसून येत आहे. शिक्षणामुळे सामाजिक ओळख तसेच राष्ट्रीय विकासात देखील महिलांची योगदान हे वाढत जात आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

1)देशपांडे सुलभा, महिला आणि शिक्षण एक अभ्यास, पद्म प्रकाशन, मुंबई

2)शिंदे व्ही. एम., स्त्री शिक्षणाचे सामाजिक परिणाम, नूतन प्रकाशन, औरंगाबाद

3)कुलकर्णी म. स., भारतातील महिलांचे शिक्षण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

4)डॉ. देशमुख नंदिनी, भारतातील महिलांचे शिक्षण, ज्ञानगंगा पब्लिकेशन, मुंबई